# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 22.06.2024** **वार – शनिवार**

---

**ससून**

ससून रुग्णालयामध्ये येणारा रुग्ण हा गरीब असतो त्यामुळं डॉक्टरांनी कोणत्याही परिस्थितीत रुग्णांना बाहेरून औषधे आणावयास सांगू नये. रुग्णांना औषधं लिहून देताना रुग्णालयात उपलब्ध असतील तीच औषधे द्यावीत असे निर्देश बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी दिले आहेत. महाविद्यालय परिषदेच्या बैठकीत त्यांनी औषध खरेदी आणि रुग्णांना बाहेरून औषधे आणण्यास लावण्याच्या मुद्द्यावर चर्चा केली. रुग्णांना रुग्णालयातच मोफत औषधे देण्याचं धोरण आधीपासून स्वीकारण्यात आलं आहे. मात्र, काही डॉक्टर रुग्णांना बाहेरून औषधे आणण्यास सांगतात, अशा तक्रारी वारंवार येत असतात.

**डीएपी**

ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर राज्यात विशेषतः सोयाबीन लागवड क्षेत्रामध्ये डीएपी या रासायनिक खताचा तुटवडा जाणवू लागला आहे. शेतकऱ्यांनी डीएपीला पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात उपलब्ध संयुक्त आणि मिश्र खतांचा वापर करावा असं पुणे कृषी निविष्ठा आणि गुणनियंत्रण विभागाचे कृषी संचालक विकास पाटील यांनी सांगितलं. राज्य सरकारनं यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्राकडे पाच लाख टन डीएपी खतांची मागणी केली होती. आतापर्यंत 3 लाख 10 हजार टन डीएपी खत मिळालं असून त्यापैकी 1 लाख 50 हजार टन खताची विक्री झाली आहे.

**डेंग्यू**

पुणे शहराच्या मंगळवार पेठेतील सदानंदनगरमध्ये डेंग्यूचे 20 संशयित रुग्ण आढळून आले आहेत. इथल्या घरांची तपासणी आरोग्य विभागानं केल्यानंतर इमारतीच्या टाक्यांमध्ये दूषित पाणी आढळून आलं. याप्रकरणी संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे अशी माहिती पुणे महापालिका सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर सूर्यकांत देवकर यांनी दिली. वीसपैकी 9 जणांना डेंग्यूचा संसर्ग झाल्याचं निदान झालं आहे. शहरात डेंग्यूचे या महिन्यात 63 तर यावर्षी आतापर्यंत 393 संशयित रुग्ण आढळले आहेत.

**स्मारक**

पुणे शहराच्या मध्यवस्तीमधील गंज पेठेत महात्मा ज्योतिराव फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकांचा एकत्रित विकास करण्यासाठी 10 हजार 942 चौरस मीटर क्षेत्र संपादीत करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या जागेवर आजमितीला जुनी घरं आणि वाडे असून तिथं 516 घरमालक तर 286 भाडेकरू अशी सुमारे 802 कुटुंब वास्तव्यास आहेत.

**केबल**

पावसात रस्त्यावर साठणारे पाणी वाहून जाण्यासाठी तयार केल्या गेलेल्या भूमिगत गटारातील खासगी कंपन्यांच्या केबल काढून टाकल्यानंतर आता त्या परिसरातील नागरिकांना इंटरनेटची समस्या भेडसावू लागली आहे. अनेक भागात इंटरनेट सेवा बंद झाली असून अन्य काही भागात या सेवेचा वेग कमी झाल्याचं निदर्शनास आलं आहे. खासगी इंटरनेट कंपन्यांनी आता आपल्या केबलसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची मागणी आता पुढे आली आहे.

**प्रशिक्षण**

या वर्षीच्या आषाढी पालखी सोहोळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याच्या संबंधित तालुक्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांचं काल दुर्घटना प्रतिसाद प्रणालीविषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं. कर्नल विश्वास सुपनेकर यांनी दुर्घटना प्रतिसाद प्रणालीबाबत सविस्तर मार्गदर्शन केलं. विवेक नायडू आणि लखन गायकवाड यांनी गर्दी, चेंगराचेंगरी, कृत्रिम श्वसन, आग प्रतिबंध याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केलं.

**पालख्या**

आषाढी वारीच्या पालख्या पिंपरी चिंचवड शहरात येण्याच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. देहुगाव कमान ते परांडवाल चौक, तळवडे देहू देहू फाटा इथून देहू गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जड वाहतूक बंद करण्यात आली आहे. दिघी आळंदी इथला चिंबळी फाटा चौक वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. निगडीतील भक्ती शक्ती चौक इथून मुंबईकडून येणारी वाहनांना रस्ता बंद करण्यात येणार आहे. हा वाहतूक बदल 30 जून मध्यरात्री ते रात्री नऊपर्यंत राहणार आहे.

**ऑलिम्पिक**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना आणि महाराष्ट्र क्रीडा संचलनालयाच्या वतीनं उद्या जागतिक ऑलिम्पिक दिन साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त सकाळी पुण्यातील लाल महल इथून क्रीडा फेरी काढण्यात येणार आहे. स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर जिम्नॅस्टिक, तायक्वांदो, योगासन, मल्लखांब, मर्दानी खेळांचे सादरीकरण देखील करण्यात येईल. ऑलिम्पियन आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान, ऑलिम्पिक दौड, हॉकी स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांनी हा दिवस साजरा केला जाणार आहे.

**एनसीसी**

राष्ट्रीय छात्र सेनेच्या संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिरामध्ये पुणे विद्यार्थी गृहाच्या मुक्तांगण इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या एअर विंग कॅडेट्सनी घवघवीत यश संपादन केलं. दहा दिवसांच्या निवासी शिबिरात नववीतील 21 कॅडेट्स सहभागी झाले होते.

**पुतळा**

पुण्यातील बावधन परिसरात 17 फूट उंचीच्या चौथऱ्यावर 20 फूट कास्य धातूचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 6 कोटी 56 लाख रुपयांच्या निविदेला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**